नि.फौ.प्र.क्र.६६/२०२१
सरकार/रुपेश
निशाणी – २०

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की –
माझे नावः गुरुदास उर्फ साहेबराव शंकर सोनटक्के,
वयः ५० वर्षे, व्यवसायः मजुरी,
निवासस्थानः खापरी धर्मु, ता. चिमूर, जि. चंद्रपूर.

**<u>शपथेवर सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. के. व्ही. तोकलवार यांच्यामार्फत</u>**

मी आरोपीला ओळखतो. तो माझ्या गावचा आहे. फिर्यादी प्रसाद शिरभय्ये हे माझ्या घराजवळ राहतात. घटना सन २०२१ मध्ये संध्याकाळी ०६.०० ते ०७.०० वाजताच्या सुमारास खापरी धर्मु येथे हनुमान मंदिराच्या जवळ घडली होती. त्यावेळी फिर्यादी व आरोपी हे एकमेकांना शिवीगाळ करत होते. माझे घर मंदिराला लागुन आहे. त्यावेळी मी माझ्या घराच्या अंगणात होतो. प्रसाद व रुपेश यांनी एकमेकांना हाताने ढकलढुकल केली होती. त्यानंतर मी माझ्या घरामध्ये गेलो. असे घडले नव्हते की, घटनेच्या वेळी आरोपीने फिर्यादीला काठीने डोक्यावर मारले व तसेच लाथा बुक्यांनी सुध्दा मारहाण केली होती.

**(साक्षीदार हा सरकारपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सहायक सरकारी वकिलांनी उलटतपासनीच्या अनुशंघाने प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजुर.)**

०२. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी आरोपीने फिर्यादीला काठीने डोक्यावर मारले व तसेच लाथा बुक्यांनी सुध्दा मारहाण केली होती. आता मला माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ दाखविण्यात आला. तो मी पोलीसांना सांगीतला नव्हता. तो पोलीसांनी माझ्या बयाणामध्ये का नमुद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्याकरिता मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री. जी. जी. अगडे वकील यांचे मार्फत</u>**

०३. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी प्रसाद शिरभय्ये हा नेहमी दारु पिवून

लोकांसोबत भांडण करतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या भांडणावरुन त्याच्या विरुध्द पुष्कळ प्रकरण दाखल झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी आरोपी हा फिर्यादीच्या घरी सोयाबीन भरण्याच्या कामाकरीता होता. हे म्हणणे खरे आहे की, ते काम करण्याकरीता फिर्यादीच्या वडीलांनी आरोपीला सांगीतले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व आरोपी यांच्यात पुर्वीपासुन पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या मेहुणीसोबत फिर्यादीचे लग्न झाल्यापासून फिर्यादी व आरोपी यांचे पटत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी फिर्यादीच्या घरी सोयाबीन भरण्याकरीता का आला यावरून त्यांचे वाद झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी फिर्यादी दारु पिवून होता.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – चिमूर
दिनांक – १५/०९/२०२५

(आर. डी. भुयारकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर